# खरे शिष्यत्व

## शिष्यत्व हे महत्त्वाचे नाते

जेव्हा एखाद्या साधकाचा सद्गुरूशी स्वेच्छेने संबंध जुळून येतो, तेव्हा तो शिष्य झाला, असे म्हटले जाते. मात्र हा संबंध केवळ औपचारिक असेल तर त्याला खऱ्या शिष्यत्वाचे स्वरूप प्राप्त होत नाही. शिष्य व सद्गुरू यांच्यामधील नाते हे, उदाहरणार्थ, शाब्दिक व्यवहार किंवा लिखित करार यांच्या द्वारे हक्क व जबाबदाऱ्या निर्माण करणाऱ्या कायदेशीर संबंधांपेक्षा पूर्णपणे भिन्न असते. शिष्यत्व हा अध्यात्ममार्गावरील प्रगत साधकाच्या जीवनाच्या मूलभूत बनून राहिलेल्या घटकांपैकी एक घटक होय. ते कोणत्याही कृत्रिम पद्धतीने निर्माण होऊ शकत नाही. ***आध्यात्मिक जीवनाच्या पायाभूत अशा नियमांतून त्याचा उदय होत असतो.*** त्यामुळे ते, प्रासंगिक संबंध किंवा तात्पुरते करारमदार यांच्या योगाने सामान्य दैनंदिन व्यावहारिक जीवनाच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या ऐहिक नातेसंबंधांपेक्षा कितीतरी अधिक मोलाचे असते. या ऐहिक नात्यांपैकी अनेकांचा साधकाच्या आध्यात्मिक जीवनाच्या जडणघडणीत प्रवेश झालेला नसतो; ती नाती त्याच्या अस्तित्वाशी केवळ वरवर उथळपणे जोडलेली राहतात.

अशा प्रकारे, तुम्ही एखाद्या वस्तूची किंमत जर चुकती करीत असाल, तर ती वस्तू तुम्ही या दुकानदाराकडून विकत घेतली की, त्या दुकानदाराकडून, या गोष्टीला परिणामाच्या दृष्टीने फारसे महत्त्व उरत नाही; याचप्रमाणे, तुम्ही जर तुमच्या ठरलेल्या ठिकाणी जाऊन पोहोचत असाल, तर तुम्ही या जहाजाने प्रवास करता की त्या जहाजाने, याला महत्त्व नाही. हे ऐहिक व्यवहारसुद्धा निःसंशयपणे ***सांस्कारिक बंधनांनी व कर्मनियमांनी*** निश्चित रूप धारण करत असतात. आणि म्हणूनच ते पूर्णपणे आध्यात्मिक मूल्यविरहित असत नाहीत. तथापि ही नाती

स्वभावतःच तात्पुरत्या व उथळ स्वरूपाची असतात. त्यामुळे साधकाच्या जीवनाला अर्थपूर्णता प्राप्त करून देणाऱ्या व योग्य दिशा दाखविणाऱ्या शिष्यत्वाच्या मौलिक नात्याशी त्यांची कोणत्याही दृष्टीने तुलनाच होऊ शकत नाही.

### प्रेम हे शिष्यत्वाचा गाभा

सद्गुरू व शिष्य यांच्यामधील नाते म्हणजे साधकाच्या जीवनातील आंतरिक खळबळींची झालेली अपरिहार्य परिणती होय. ते प्रामुख्याने प्रियकर व त्याचा दैवी प्रियतम यांच्यामधील नाते होय. ज्यामध्ये मनुष्य प्रवेश करू शकतो असे हे आध्यात्मिक दृष्ट्या सर्वात महत्त्वाचे नाते होय. सामान्य दैनंदिन जीवनातील नात्यागोत्यांत प्रेमाचे जे विविध प्रकार नांदत असतात, त्यामध्ये शिष्यत्वाचा गाभा असलेले जे प्रेम त्याला आगळेवेगळे स्वयंभू स्थान आहे. ऐहिक प्रेम हा ईश्वराची जाणीव नसलेल्या दोन केंद्रांचा परस्परातील व्यवहार होय; ***परंतु शिष्यत्वात सामावलेले प्रेम म्हणजे नेणिवेतील ईश्वराचे जाणिवेतील ईश्वराविषयीचे प्रेम होय.*** प्रत्येकजण ईश्वर आहे, पण काहीजणांना आपल्या ईश्वरत्वाची जाणीव नसते. काहीजणांना आपल्या ईश्वरत्वाची अंशतः जाणीव असते तर काही थोड्यांना ईश्वरत्वाची पूर्णपणे जाणीव असते. ज्यांना स्वतःच्या ईश्वरत्वाची जाणीव नसते, त्यांना ईश्वरी अवस्थेची कल्पनाही करता येणार नाही; त्यांना फक्त शारीरिक अवस्थेची [स्थूल अवस्थेची] जाणीव असते. त्यांना जर ईश्वरी अवस्थेचा वारसा प्राप्त करून घ्यावयाचा असेल, तर त्यांनी सतत ईश्वरी अवस्थेत वास करणाऱ्या सद्गुरूवर प्रेम केले पाहिजे, त्याची पूजा केली पाहिजे व त्याचे मार्गदर्शन घेतले पाहिजे.

### सद्गुरूचा हक्क सर्वश्रेष्ठ

साधकाला सद्गुरूबद्दल वाटणारे प्रेम म्हणजे वस्तुतः सद्गुरूला त्याच्याबद्दल अधिक प्रमाणात वाटणाऱ्या प्रेमाने द्यावयास लावलेला प्रतिसाद असतो. या प्रेमाला इतर सर्व प्रेमांपेक्षा श्रेष्ठ स्थान दिले पाहिजे. सद्गुरूबद्दलचे प्रेम हे स्वाभाविकपणे साधकाच्या जीवनातील केंद्रशक्ती बनून राहते, कारण सद्गुरू हा अमर्याद ईश्वराचे मूर्तिमंत व प्रातिनिधिक स्वरूप असल्याचे तो जाणत असतो. त्यामुळे त्याचे सर्व विचार व आकांक्षा सद्गुरूच्या व्यक्तिमत्वाभोवती गुंफल्या जातात. अशा रीतीने, साधकाने स्वीकारलेल्या हक्कांत सद्गुरूच्या हक्काचे स्थान निःशंकपणे सर्वश्रेष्ठ असते; आणि या सर्वश्रेष्ठतेच्या द्वारे सद्गुरू अशा आध्यात्मिक शक्तींच्या प्रक्षेपणाचा

केंद्रबिंदू बनतो की, ज्या [अज्ञानरूपी] अंधकाराला नष्ट करतात, अंतःकरणातील पापांचा निचरा करतात आणि साधकाचा स्वतंत्रतेच्या व ईश्वरी सत्याच्या जाणिवेच्या जीवनात प्रवेश करून देतात.

## सर्व प्रेमाचा ओघ सद्गुरूकडे – मजनू व लैला यांच्या कथेतल्याप्रमाणे

ज्या साधकाला खराखुरा शिष्य व्हायचे असेल त्याच्या दृष्टीने मूलभूत गरज आहे ती सद्गुरूवर निःशंकपणे प्रेम करण्याची. प्रेमाचे इतर सर्व प्रवाह अखेरीस सद्गुरू-प्रेमाच्या या महानदीला जाऊन मिळतात व त्यातच विसर्जन पावतात. मजनू व लैला यांची कथा ही याचे उत्तम उदाहरण आहे. मजनूचे लैलावर प्रेम होते. तो तिच्यावर इतक्या उत्कटतेने प्रेम करीत होता की, त्याच्या जीवनातील प्रत्येक क्षण हा तिच्यासंबंधीच्या विचारांनी भारून गेलेला होता. तिचा विचार केल्याशिवाय तो खाऊ, पिऊ व झोपू शकत नसे; त्याला हवे होते ते फक्त लैलाचे सुखसमाधान. तिचे दुसऱ्या कोणा पुरुषाशी लग्न होणे हे तिच्या हिताचे आहे असे वाटल्यास, तसे लग्न झालेले पाहण्यास तो आनंदाने तयार झाला असता. इतकेच नव्हे, जर त्याला वाटले असते की, आपण तिच्या पतीकरिता स्वतःचा प्राण दिल्याने ती सुखी होईल, तर त्याने तसे करण्यासही मागेपुढे पाहिले नसते. संपूर्ण आत्मसमर्पण व प्रेमातील प्रामाणिकपणा यांच्यामुळे त्याला अखेरीस सद्गुरूची प्राप्ती झाली. आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणी तो स्वतःबद्दल नव्हे, तर आपल्या प्रियतमेबद्दल विचार करीत राहिला, आणि त्यामुळे त्याच्या प्रेमाने शारीरिक व बौद्धिक पातळी ओलांडून आध्यात्मिक प्रेमाची उंची गाठली. आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झालेल्या त्याच्या प्रेमाने त्याला दैवी प्रियतमाप्रत नेऊन पोचविले.

## प्रेम व आत्मसमर्पण यांच्या द्वारे शुद्धी

सद्गुरू हा दैवी प्रियतम होय. जेव्हा शिष्य सद्गुरूला भेटतो, तेव्हा त्याने जर काही करावयाचे असेल तर ते म्हणजे सद्गुरूवर प्रेम करणे; कारण, जर शिष्याने सद्गुरूवर भरल्या अंतःकरणाने प्रेम केले, तर त्याचे सद्गुरूशी अखेरचे मीलन निश्चित समजावे. त्याने आपल्या प्रेमाच्या गुणवत्तेबद्दल काळजी करण्याचे कारण नाही. स्वतःमध्ये दोष व उणिवा असल्या तरी त्याने प्रेम करीत रहावे, आपले अंतःकरण शुद्ध करेपर्यंत वाट पहात बसू नये. सद्गुरू हा तर पावित्र्याचा मूर्तिमंत स्रोत असतो, आणि त्याच्यावर आपले अंतःकरण केंद्रित करणे, हाच मुळी आत्म-शुद्धीचा प्रारंभ

होय. जेव्हा शिष्य अंतःकरणपूर्वक सद्गुरूवर प्रेम करतो तेव्हा तो, सद्गुरू त्याच्यावर वर्षाव करीत असलेल्या दैवी प्रेमाच्या ग्रहणासाठी स्वतःला खुले करत असतो. अशा प्रकारे जे दैवी प्रेम त्याला ग्रहण करावयास मिळते, त्या प्रेमाच्या अग्नीमध्ये त्याचे सर्व दोष जळून खाक होतात. जर शिष्याला सर्व दोषांपासून मुक्त होऊन निर्भेळ व अमर्याद पावित्र्य प्राप्त करून घ्यावयाचे असेल, तर त्याने हातचे काहीही राखून न ठेवता, किंवा सोयी-गैरसोयींचा विचार न करता, आपले जीवन सद्गुरू-चरणी समर्पण केले पाहिजे. त्याने आपली मर्मस्थाने तसेच बलस्थाने, आपले दुर्गुण तसेच सद्गुण समर्पित केले पाहिजेत. या समर्पणात 'जर' व 'परंतु' यांना मुळीच थारा असता कामा नये. त्याचे आत्म-समर्पण इतके परिपूर्ण असले पाहिजे की, त्याच्या मनामध्ये एखाद्या गुप्त स्वार्थी इच्छेच्या सावलीलाही त्याने जागा मिळू देता कामा नये.

### श्रद्धेचे मोल

जेव्हा शिष्य सद्गुरूच्या ठायी अढळ श्रद्धा प्राप्त करून घेतो, तेव्हाच परिपूर्ण आत्म-समर्पण व निःशंक प्रेम शक्य होतात. सद्गुरूच्या ठिकाणी प्रगाढ श्रद्धा हा खऱ्या शिष्यत्वाचा अपरिहार्य भाग आहे. जेव्हा मनुष्य स्वतःला मनुष्य समजतो तेव्हा जसा श्रद्धेचा प्रश्न नसतो, त्याप्रमाणे एकदा का ईश्वर-साक्षात्कार झाला की श्रद्धेचा प्रश्नच उरत नाही. परंतु ही ईश्वर-साक्षात्काराची अवस्था प्राप्त करून घेईपर्यंत शिष्याने सद्गुरूवर ठेवलेली श्रद्धा हीच त्याचा सर्वात विश्वासू मार्गदर्शक प्रकाश असते. तिची तुलना जहाजाला दिशा दाखविणाऱ्या सुकाणूशी करता येईल. श्रद्धेचे 'आंधळी' म्हणून वर्णन करणे बरोबर नाही, कारण ती [बंधनातून] सुटका होऊ न देणाऱ्या अज्ञानासारखी असण्यापेक्षा, एखाद्या दृश्यासारखी अधिक असते. मात्र साधकाने स्वतःला ईश्वरसाक्षात्कार घडवून आणेपर्यंत, ती प्रत्यक्ष अनुभवापेक्षा कमीच पडते.

सर्व धर्मांचा उल्लेख ''श्रद्धा'' असा केला जातो तो उगीच नव्हे. साधकाच्या जीवनातील आवश्यक गोष्टींपैकी एक म्हणजे त्याच्याजवळ श्रद्धा असली पाहिजे. श्रद्धा ही विविध रूपांद्वारे स्वतःला प्रगट करू शकते, परंतु मानसशास्त्राच्या दृष्टीने ही सर्व रूपे एकच होत; त्यांना निरनिराळी नावे देता येणार नाहीत. श्रद्धेमध्ये जे फरक असतात ते केवळ अंशात्मक असतात. श्रद्धा ही दृढ व ज्वलंत असू शकेल, किंवा दुबळी व डळमळीत असू शकेल. दुबळी व डळमळीत श्रद्धा माणसाला धार्मिक विधी-समारंभांना जखडून ठेवण्यापलीकडे नेऊ शकत नाही, परंतु दृढ व ज्वलंत

श्रद्धा मात्र साधकाला निश्चितपणे धर्माच्या बाह्य रूपांपलीकडे नेऊ शकते; तसेच ती खऱ्या आध्यात्मिक जीवनातील अनावश्यक गोष्टी [गाळ] बाजूला सारून त्यातील सारभूत तत्त्वांपर्यंत पोहोचण्यास साहाय्य करते. श्रद्धा ही जेव्हा एखाद्या सद्गुरूच्या ठायी विसावते, तेव्हा ती तिचा स्वाभाविक सर्वोच्च बिंदू व ध्येय गाठते.

## कल्याणविषयीची कथा

शिष्याची श्रद्धा ही नेहमी सद्गुरूच्या दैवी स्वरूपाच्या अनुभवावर भक्कमपणे आधारलेली असली पाहिजे. वाऱ्याच्या लहानशा झुळुकीनेसुद्धा इतस्ततः उडून जाणाऱ्या गवताच्या काडीप्रमाणे ती असता कामा नये. भयंकरातल्या भयंकर वादळातसुद्धा निश्चल राहणाऱ्या खडकाप्रमाणे ती असली पाहिजे. सद्गुरूवरील खऱ्याखुऱ्या दृढ श्रद्धेचा अर्थ कल्याणविषयीच्या कथेवरून स्पष्ट होतो. कल्याण हा शिवाजीमहाराजांच्या काळात सद्गुरू असलेल्या स्वामी रामदासांचा शिष्य होता. ज्याप्रमाणे माणूस आपल्या शरिराच्या सर्व अवयवांवर प्रेम करीत असूनही त्याला बोटांपेक्षा डोळे अधिक प्रिय असू शकतील, त्याप्रमाणे सद्गुरू आपल्या सर्व शिष्यांवर सारखेच प्रेम करत असूनही, काहीजण त्याचे विशेष लाडके असू शकतात.

स्वामी रामदासांचे अनेक शिष्य होते, पण कल्याण हा त्यांचा आवडता शिष्य होता. इतर शिष्यांना, कल्याण हा सद्गुरूला आपणापेक्षा जास्त प्रिय का ते समजत नव्हते.

एकदा रामदासांनी आपल्या शिष्यांच्या श्रद्धेची परीक्षा घेतली. त्यांनी सर्व शिष्यांना आपल्याजवळ बोलावले आणि, आपण इतके आजारी आहोत की लवकरच मरणार, असे सोंग आणले. त्यांनी एक आंबा आपल्या गुडघ्यावर ठेवून तो कापडाच्या पट्टीने बांधून टाकला होता; त्यामुळे गुडघ्यावर फार मोठी सूज आल्यासारखे दिसत होते. स्वामी रामदास या सुजेकडे बोट दाखवीत शिष्यांना म्हणाले की, ते एक अत्यंत प्राणघातक असे गळू आहे आणि कोणीतरी त्याच्या द्वारे गुडघ्याच्या सांध्यातील विष चोखून घेतल्याशिवाय त्यांचा जीव वाचण्याची आशा नाही. याच वेळी त्यांनी सर्वांना हेही स्पष्ट करून सांगितले की, जो कोणी विष चोखून घेईल तो तत्काळ मरण पावेल. नंतर त्यांनी, कोणी शिष्य स्वतःच्या प्राणांचे मोल देऊन सुजेतील विष चोखून घेण्यास तयार आहे का, असे विचारले. यावर एका कल्याणखेरीज इतर सर्व शिष्यांची चलबिचल झाली. कल्याण मात्र झटकन् उठला आणि त्याने सुजेची जागा चोखण्यास सुरुवात केली. परंतु विषाऐवजी आंब्याच्या गोड रसाच्या चवीचा अनुभव

येताच तो आश्चर्यचकित झाला. स्वामी रामदास यांनी त्याच्या अविचल श्रद्धेची व निःस्वार्थी प्रेमाची प्रशंसा केली. दैवी प्रियतमाच्या सुखासाठी प्राणार्पण करण्यास तयार असणे, हे खरे प्रेम होय. कल्याणासारखी अढळ श्रद्धा, अव्यभिचारी प्रेम व निष्ठा शिष्याला केवळ सद्गुरूच्या कृपेद्वारेच प्राप्त होऊ शकतात.

## सेवेद्वारे सद्गुरु-साक्षात्कार

सद्गुरूच्या ठायी असलेल्या अव्यभिचारी निष्ठेमुळे शिष्याच्या जीवनाच्या क्षेत्रात कसलाही संकुचितपणा निर्माण होत नाही. सद्गुरूची सेवा करणे म्हणजे इतर प्रत्येक जीवात्म्याच्या ठिकाणी असलेल्या तुमच्या स्वतःच्या आत्म्याची सेवा करण्यासारखे असते. सद्गुरू हा विश्वव्यापी जाणिवेत वास करतो व अखिल विश्वसृष्टीच्या आध्यात्मिक कल्याणाची इच्छा धरतो. म्हणूनच, सद्गुरूची सेवा करणे म्हणजे, अखिल जीवसृष्टीची सेवा करण्याचे त्याचे जे कार्य, त्यात सहभागी होण्यासारखे असते. सद्गुरूच्या कार्यात सहभागी होताना शिष्याला या ऐहिक जगातील व्यवहारांशी संबंध ठेवणे भाग पडते; पण तो जरी त्याला नेमून देण्यात आलेल्या कार्यानुसार या जगात फिरत असला, तरी अंतर्यामी त्याचा सद्गुरूच्या अमर्याद अस्तित्वाच्या स्वरूपाशी संपर्क असतो. परिणामी, सद्गुरूच्या कार्यात सहभागी झाल्याने शिष्य त्याच्या अधिक निकट येतो व त्याच्या [विश्वव्यापी] जाणिवेचा अविभाज्य भाग बनून राहतो. सद्गुरूची सेवा हा त्याला जाणण्याचा सर्वात शीघ्र मार्ग होय.

## सद्‌गुरूच्या कार्यातील सहभाग

शिष्य जी सेवा सद्गुरूला अर्पण करू शकतो ती केवळ मानवजातीशी संबंधित विश्वव्यापी कार्याशी जोडलेली असते असे नाही, तर ती शिष्याला त्याच्या आध्यात्मिक ध्येयाच्या अधिकाधिक जवळ नेणाऱ्या सर्वांत प्रभावी साधनांपैकी एक साधनही असते. जेव्हा शिष्याची सेवा ही उत्स्फूर्त, तन-मन-धन ओतून केलेली, निःस्वार्थ व कसल्याही अटीविरहित असते, तेव्हा ती इतर कोणत्याही साधनांपासून मिळणाऱ्या आध्यात्मिक लाभापेक्षा अधिक आध्यात्मिक लाभ प्राप्त करून देत असते. सद्गुरूची सेवा ही जरी शिष्याच्या दृष्टीने त्याच्या शरिराचा व मनाचा कस पाहणारे एक दिव्य असले, तरी त्या सेवेतूनही त्याला आनंद मिळत असतो. अडचणींच्या व गैरसोयींच्या परिस्थितीत सेवा करणे ही शिष्याच्या भक्ति-प्रेमाची कसोटीच असते. ही सेवा जितकी अधिक खडतर तितकी ती शिष्याच्या दृष्टीने

अधिक स्वागतार्ह ठरते. खेरीज, त्याने सद्गुरूच्या एकनिष्ठ सेवेतील शारीरिक व मानसिक यातना स्वेच्छेने स्वीकारलेल्या असल्याने, त्याला आध्यात्मिक सफलतेचा आनंद भोगावयास मिळतो.

## सद्गुरूवरील निष्ठा

सद्गुरू कोण आहे व खरोखरी कोणत्या कार्यासाठी आहे याच्या अचूक आकलनामुळे त्याच्या ठिकाणी अभंग व खरी निष्ठा ठेवणे शक्य होते. जर सद्गुरूची योग्यता व कार्य यांच्यासंबंधी शिष्याची धारणा अपूर्ण, अर्धवट असेल तर आपल्या स्वतःचा श्रेष्ठतर आत्मा व सद्गुरू यांच्यामध्ये तो खोटा अंतर्विरोध निर्माण करण्याची शक्यता असते. या अंतर्विरोधाचा परिणाम म्हणजे, तो आपल्या मनात, सद्गुरूचे हक्क व इतर न्याय्य वाटणारे हक्क यांच्यामध्ये अस्वाभाविक व काल्पनिक संघर्ष निर्माण करू पाहतो. शिष्याने अगदी सुरुवातीपासून हे समजून घेतले पाहिजे की, शिष्याने स्वतःच्या श्रेष्ठतम आत्म्याचा साक्षात अनुभव घ्यावा, इतकीच काय ती सद्गुरूची इच्छा असते. वस्तुतः, सद्गुरू हा शिष्याच्या या श्रेष्ठतम आत्म्याचे प्रतीक असतो, नव्हे, या श्रेष्ठतम आत्म्याखेरीज दुसरे काहीही तो नसतो, आणि हा आत्माच सर्वांच्या अंतर्यामी असणारे तेच ते एकमेव सत्य होय.

अशा प्रकारे, सद्गुरूच्या ठिकाणी निष्ठा म्हणजे केवळ स्वतःच्या श्रेष्ठतम आत्म्याच्या ठिकाणी असणाऱ्या निष्ठेचेच दुसरे रूप होय. याचा अर्थ असा मात्र नव्हे की, श्रेष्ठतम आत्म्याशी केवळ औपचारिक एकनिष्ठा ही कोणत्या तरी प्रकारे सद्गुरूच्या ठायी ठेवावयाच्या एकनिष्ठेला समर्पक पर्याय आहे. ईश्वर-साक्षात्कार होईपर्यंत शिष्याला स्वतःच्या उच्चतम आत्म्याचा स्वच्छपणे अनुभव येऊ शकत नाही आणि बऱ्याच वेळी कर्तव्य म्हणून त्याच्या अंगावर जे पडत असते, ते खरोखरीच श्रेष्ठतम आत्मा व त्याच्या [शिष्याच्या] जाणिवेचे क्षेत्र यांच्यामध्ये अडसर निर्माण करणाऱ्या संस्कारांची चेतावणी असते. याउलट सद्गुरू हा श्रेष्ठतम आत्म्याशी एकरूप झालेला असल्याने, अचूक मूल्यमापनाच्या बाबतीत त्याच्याकडून कसलीही गफलत होणे शक्य नसते.

## संघर्षाची उदाहरणे

म्हणून, शिष्याने सद्गुरूने घालून दिलेल्या निकषांच्या वा त्याच्या आज्ञांच्या साहाय्याने आपल्या स्वतःच्या मानसिक प्रेरणांची वारंवार तपासणी केली पाहिजे;

आणि जर का दोहोंमध्ये संघर्षाचा प्रसंग उद्‌भवला, तर त्याने आपल्या विचारांची संपूर्णतया फेरतपासणी करून अशा बाबी शोधून काढल्या पाहिजेत की ज्यांच्यामुळे ते विचार पूर्णत्वाला पोचण्यात कमी पडतात. अशा वेळी बव्हंशी थोड्याशा चिंतनानेदेखील त्याला त्याच्या उच्चत्तम आत्म्याकडून मिळणाऱ्या सूचना व सद्गुरूला अपेक्षित असलेल्या गोष्टी यांच्यातील मूलभूत सुसंवादाचे पुरेसे आकलन होण्याजोगे असते. तथापि, जर कचित् प्रसंगी शिष्य त्या दोहोंमध्ये सुसंवाद घडवून आणण्यास असमर्थ ठरला, तर मग त्याने निश्चितपणे समजावे की, एकतर त्याला आपल्या उच्चतम आत्म्याच्या सूचना नीटपणे समजल्या नसाव्यात, किंवा आपल्या सद्गुरूच्या आदेशांचा गर्भितार्थ नीटपणे कळला नसावा. अशा प्रसंगी सद्गुरू शिष्याला स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीनुसार वागण्याची मोकळीक देतो. आपल्या शिष्याची उच्चतर जीवन जगण्याच्या दृष्टीने तयारी करून घ्यावी या हेतूने सद्गुरू कधीकधी सूचना देत असतो. आणि या अशा तऱ्हेच्या परिस्थितीमध्ये शिष्याला आढळून येते की, आपण स्वतःच्या मानसिक प्रवृत्ती व सद्गुरूच्या सूचना यांच्यामधील वरवरच्या व तात्पुरत्या स्वरूपाच्या भेदांच्या द्वंद्वात सापडलो आहोत. परंतु ज्यांच्याबाबत शिष्याची अपेक्षित आंतरिक पूर्वतयारी झालेली नाही अशा प्रकारच्या कोणत्याही सूचना सद्गुरू सहसा त्याला देत नाही.

### शिष्यत्वाचा खरा अर्थ

सद्गुरू म्हणजे सर्वश्रेष्ठ निर्गुण-निराकार स्वरूप होय. त्याला जी सदैव एकच तळमळ लागून राहिलेली असते ती म्हणजे, शिष्याची जाणीव व त्याचा उच्चतम आत्मा यांच्यामध्ये असलेले [संस्कारांचे] पडदे दूर कसे सारावयाचे याची. त्यामुळेच, शिष्याची आपल्या सद्गुरूवरील निष्ठा व स्वतःच्या श्रेष्ठतम आत्म्याशी असलेली निष्ठा यांच्यात खराखुरा संघर्ष कधीच होऊ शकत नाही. खरोखरीच, आपल्या शोधाच्या अखेरीस शिष्याला असे आढळून येते की, सद्गुरू हा वेगळ्या रूपातील स्वतःच्याच उच्चतम आत्म्याखेरीज दुसरे तिसरे काहीही नाही. सद्गुरू हा आपल्या सर्वस्वी निर्गुण - निराकार व अखंड दैवी स्वरूपात इतका परिपूर्ण असतो की, त्याला कसलीच इच्छा नसते. शिष्याच्या संदर्भात त्याची जास्तीत जास्त अपेक्षा असते ती एवढीच की, शिष्याने श्रेष्ठतम दैवी सत्याच्या प्रकाशात स्वतःच्या व्यक्तित्वाची पुनर्बांधणी करावी. शिष्य होणे म्हणजे, आध्यात्मिक ध्येयाप्रत घेऊन जाणाऱ्या मार्गावर वाटचाल करण्यास आरंभ करणे होय. खऱ्या शिष्यत्वाचा हा अर्थ आहे.